

# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ७९ टक्क्यांनी पास

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईत मेट्रोचे जाळे विणण्याचे काम प्रगतिपथावर असून, देशातील पहिल्या भूमिगत मेट्रो ३चे आतापर्यंत ३३.५ किमी लांबीच्या मार्गिकेचे काम ७९ टक्के पूर्ण झाले आहे. आरे-बीकेसी या पहिल्या टप्प्याचे ८४, तर बीकेसी-कफ परेड या दुसऱ्या टप्प्याचे काम ७५.६ टक्के काम पूर्ण झाले आहे.

मेट्रो ३ या वर्षीच्या डिसेंबरपर्यंत सुरू करण्याचे लक्ष्य एमएमआरसीने ठेवले आहे. त्यामुळे या टप्प्याचे काम वेगात सुरू असून, आतापर्यंत या टप्प्याचे ८४ टक्के काम पूर्ण झाले आहे. सिस्टीमचे ४६.१ टक्के, रुळाचे ५३.८ टक्के, स्थानकांचे ८८.३ टक्के काम पूर्ण झाले आहे. यापूर्वीच भुयारीकरणाचे १०० टक्के काम पूर्ण झाले आहे. आरे-बीकेसी या पहिल्या टप्प्याचे एकूण ८४ टक्के काम पूर्ण झाले आहे, तर स्थानक आणि बोगद्याचे ९७.१ टक्के, सिस्टीमचे ५९.१ टक्के, तर रुळाचे ७०.६ टक्के काम पूर्ण झाले आहे. तर बीकेसी-कफ परेड या दुसऱ्या टप्प्याचे एकूण ७५.६ टक्के काम मार्गी लागले आहे. यातील मेट्रो स्थानक आणि बोगद्याचे ९४.५ टक्के, रुळाचे ४४.२ टक्के आणि सिस्टीमचे ३९.६ टक्के काम पूर्ण झाले आहे. एकूणच मेट्रो ३ मार्गिकेचे बांधकाम वेगात सुरू आहे. मात्र कारशेडच्या कामाबाबत एमएमआरसीच्या अहवालात कोणताही उल्लेख नाही. कारशेड मेट्रो मार्गिकेतील महत्त्वाचा भाग आहे. कारशेडशिवाय मेट्रो सुरू करता येणार नाही. त्यामुळे आरेतील कारशेडचे काम वेगाने पूर्ण करण्याचे आव्हान एमएमआरसीसमोर आहे.